[५५५] श्री. ३ सप्टेंबर १७४८.

यादी करारनामा बनाम कोनेर पंडित :-

अजम कोनेरपंडित यांसी दहा लक्ष रुपये करार केले असत. सदरहू रुपये निमे पांच लक्ष हालसालांत सन अहद अहमदशाहींत देऊं. व निमे पांच लक्ष पेस्तर साल सन दुसरा अहमदशाहींत देऊं. बिलाकसूर झाडियानसी साल हालांत आदा करूं.

कलम १

देवदाय, ब्राह्मणआदाय सरकारचे मुलखांत पूर्वीं संस्थानिकांचे अमलांत जें चालत आलें आहे त्याप्रमाणें हल्लीं तुमचे मारफतीनें चालवूं. देवब्राह्मणांचे कार्यास सहसा अनमान न करूं.

कलम १

वतनसर मजमू तालुका अर्काट व त्रिचनापल्ली व चंदावर वगैरे तालुका कुल सरकार तुह्मांस मुकरर केले असे. यासी रसूम सेरसद्दे रु।। २ नेमून दिधला असे. तो तुमचे व आमचे वंशपरंपरेनें चालवूं.

कलम १

वतन देशमुखी प्रांत त्रिचनापल्लीपैकी हवेली तुह्मास करार करून दिधला असे. या वतनास रुसूम सरसद्दे रु।। २ नेमून दिधला असे, तो रयतेचे हातें देववूं. रुसुमाचा धारा भास्करराऊ हरकारे यांचा देशमुखीचा अर्काट प्रांतें आहे तो या करारापरीस ज्यादा असला तर त्याप्रमाणें देववूं. तुमचे आमचे वंशपरंपरेनें चालवूं.

कलम १

एक किल्ला चांगला मातबर एक लाखा रुपयांचे मशतरुचे जागीरीचा देऊं व हजुरीहून आपल्यास सनदा आणूं तेव्हां किल्ला व जागीरही सदरहूप्रमाणें तुमचे नांवें आणून देऊं. हालीं आपले सनदेनें चालवूं.
कलम १

सदरहू दोनी वतनाचे व किल्ल्याचे देखील जागीर सनदा तुमचे नांवें हजुरीहून जे वेळेस आह्मीं आपल्या सनदा आणवूं ते वेळेस तुह्मासही सदरहूप्रमाणें सनदा तुमचे नांवें आणून देऊं, तोंपावेतों आह्मीं आपली सनद देऊन चालवूं.
कलम १

संस्थान त्रिपती व शिवकांची विष्णुकांची येथील इजारा नवाब दोस्तअल्लीखान यांचे अंमलात चालत आला असेल त्याप्रमाणें सालदरसाल तुह्मांकडे इजारा देऊं. कांहीं चढ दरसालास न करूं. अरणी वगैरे जाले तर मजुरा देऊं.
कलम १

वकालत म।। छत्रपति व मराठे राज्याची तुह्मांस करार केली असे. तुमचे मार्फातीनें काजकाम घेऊं.
कलम १

आमचे साहेबजादे यांस तालुका हवाले होतील त्याजसमागमें तुमचे मुलांस असामिया रोजगार मातबर सांगून चालवूं.
कलम १

तुह्मीं आपले तर्फेनें साहुकार आह्मापाशीं पाठवाल त्यांचें सर्व प्रकारें जागाजागा दुकाणास स्थल देऊन चालवूं व श्रीरामेश्वर वगैरे जागाजागा लंगर व छत्र घालाल त्यांचें जमीनदाराकडून साहित्य करवूं.
कलम १

सदरहू कलमें दहा १०

छ २० रमजान